# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपचे राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्याला इतर सदस्यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. त्यांच्या रुपाने न्यायप्रिय आणि संयमी व्यक्तिमत्व निवडलं गेलं आहे, ही आनंदाची बाब असल्याचं ते म्हणाले. आपल्याकडे विधानसभा अध्यक्ष बिनविरोध निवडण्याची परंपरा असून, ही परंपरा कायम राहिली असं फडणवीस यांनी नमूद केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी देखील नार्वेकर यांचं अभिनंदन करुन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

दरम्यान, आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचं अभिभाषण होणार आहे.

****

एका खासगी समुहाचं कथित लाचखोरी प्रकरण यासह इतर मुद्यांवरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या कामकाजात आजही व्यत्यय आला.

लोकसभेत कामकाज सुरु होताच काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघमसह अन्य विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. अध्यक्ष ओम बिरला यांनी सदस्यांना सभागृहाचं कामकाज सुरु ठेवण्याचं आवाहन करत प्रश्नोत्तराचा तास सुरु केला. मात्र गदारोळ सुरुच राहील्यानं सदनाचं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

राज्यसभेतही कामकाज सुरु होताच विरोधी पक्षांनी विविध मुद्यांवर दिलेला स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यांनी सदस्यांना कामकाज सुरळीत सुरु ठेवण्याचं आवाहन केलं. यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप – प्रत्यारोप झाल्यानंतर गदारोळ वाढत गेल्यानं सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

****

भारत सरकारला बदनाम करणाऱ्या परदेशी शक्तींविरोधात पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन एकजुटीनं लढावं लागेल, असं आवाहन संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांना केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहरांशी बोलत होते. काही मुद्यांना राजकीयदृष्ट्या पाहिलं जाऊ नये, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजस्थानमध्ये जयपूर इथं आयोजित रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट अर्थात गुंतवणूक शिखर परिषदेचं उद्धाटन झालं. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यावेळी उपस्थित होते. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत उद्योग आणि व्यापार क्षेत्राचे पाच हजारांपेक्षा जास्त प्रतिनिधी, राजकीय दूत आणि गुंतवणूकदार सहभागी झाले आहेत. या शिखर परिषदेला सुरुवात होण्याआधीच गुंतवणुकीशी संबंधित सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करारही केले गेले आहेत.

****

शेतकऱ्यांनी पारंपारिक पीक पद्धती सोडून निर्यातक्षम केळी उत्पादकतेवर भर द्यावा, तसंच शेतीसह शेतमाल प्रक्रिया उद्योगाकडे वळावं, असं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे. नांदेड इथं सहकार आणि पणन विभागाअंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत : केळी उत्तम कृषी पद्धती या विषयावर आयोजित प्रशिक्षणात ते बोलत होते. मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत नांदेड, परभणी तसंच हिंगोली या तीनही जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांसाठी केळी निर्यातीसाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल असं प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव यावेळी म्हणाले. या प्रशिक्षणात नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातल्या ३५० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

****

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या आंगलगाव इथल्या ग्रामस्थांनी कृषी विभागाच्या अंतर्गत श्रमदानातून वनराई बंधारे तयार केले आहेत. या बंधाऱ्यांमुळे परिसरातल्या विहिरींच्या पाणी पातळीत वाढ झाली असून, पंधरा हेक्टरच्यावर पिकांना या पाण्याचा फायदा होणार आहे. या परिसरात एकूण १० बंधारे पूर्ण करण्याचा संकल्प या ग्रामस्थांनी केला आहे.

****

ओमानमध्ये मस्कत इथं सुरु असलेल्या महिलांच्या कनिष्ठ गट आशिया करंडक हॉकी स्पर्धेत गट साखळीतला भारताचा दुसरा सामना आज मलेशियासोबत होणार आहे. या स्पर्धेत काल भारतीय संघानं बांग्लादेशवर १३ – एक असा दणदणीत विजय मिळवला. भारतातर्फे मुमताज खान हिनं चार तर कनिका सिवाच आणि दीपिका यांनी प्रत्येकी तीन गोल केले.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून अठराशे घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. धरणात सध्या ९६ पूर्णांक २० टक्के इतका पाणीसाठा आहे.

****

नाशिक जिल्ह्यात तापमानात लक्षणीय घट झाली आहे. निफाडमध्ये आज या हंगामातलं सर्वात कमी सहा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****